# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax २३५६८२०

http://www.dteau.org

roaurangabad.dte@gmail.com


**तात्काळ**

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१२/ ६५८३

दिनांक :- 17 DEC 2012

प्रति,

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद,जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद बीड,पु.ला.लातूर, निवासी महिला लातूर

**विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अनुदानित पदविका संस्थांतील पदाचा फेर आढावा घेण्याबाबत**

**संदर्भ:-** मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.५/(३) पदांचा आढावा/२०१२/१३३४८, दि.५.१२.२०१२

उपरोक्त संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे संस्थांमध्ये नव्याने सुरु करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी तसेच काही अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ केल्यामुळे, अतिरिक्त नवीन पदे निर्माण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जे अभ्यासक्रम बंद झालेले आहेत किंवा ज्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट झालेली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी मंजूर असलेल्या पदांना अतिरिक्त ठरविणे आवश्यक असल्याने संस्थांतील पदांचा पुन्हा नव्याने आढावा घेणे आवश्यक आहे. तंत्रशिक्षण परीषदेच्या मानकांप्रमाणे संस्थांमधील पदे निश्चित करण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीची बैठक **दि.१५.१२.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदरील बैठकीस पदांच्या फेर आढाव्या बाबतची माहिती घेऊन प्राचार्यांनी स्वतः उपस्थित रहावे.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना हे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

Nov-2011/kakde 7812

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
E-mail :- desk5@dte.org.in Web :- http://www.dte.org.in

**कार्यालयीन आदेश :**

क्रमांक.: ५(३)/पदांचा आढावा/२०१२/१३३४८
दिनांक : ५ डिसेंबर २०१२

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अनुदानित पदविका संस्थांतील पदांचा फेर आढावा घेण्याबाबत....**

शासनाच्या वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक असंक-१००१/प्रक्र२९/२००१/वित्तीय सुधारणा दिनांक १० सप्टेंबर, २००१ मधील तरतुदींनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रशासकीय कार्यालये तथा सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थांतील सन २०००-२००१ पर्यंतच्या चालविण्यांत येणा-या अभ्यासक्रमानुसार मंजूर पदांचा आढावा घेण्यांत आलेला असून आढाव्यानंतर संस्था/कार्यालयात कार्यरत पदांचा एकत्रित गोषवारा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टिंईडी-८००१/(३२१/०१-भाग-३)/तांशि-५, दिनांक १-४-२००४ मध्ये नमूद करण्यांत आलेला आहे.

सदरच्या दिनांक १० सप्टेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी ३१ ऑक्टोबरपूर्वी आढावा घेण्याबाबतचेही आदेश देण्यांत आलेले आहेत. त्या अनुषंगाने सन २००१-२००२ पासून वर्ष २०१२-१३ पर्यंत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांमध्ये नव्याने सुरु करण्यांत आलेल्या अभ्यासक्रमासाठी तसेच काही अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ केल्यामुळे अतिरिक्त नवीन पदे निर्माण करणे आवश्यक असल्याने त्याचप्रमाणे जे अभ्यासक्रम बंद झालेले आहेत किंवा ज्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट झालेली आहे. अशा अभ्यासक्रमासाठी मंजूर असलेल्या पदांना अतिरिक्त ठरविणे आवश्यक असल्याने सदर संस्थांतील पदांचा आढावा पुन्हा नव्याने घेणे आवश्यक असल्याने या संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांतील पदांचा आढावा घेण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांप्रमाणे संबंधित संस्थांतील पदे निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समिती गठित करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. सुभाष महाजन | प्र.संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई | --अध्यक्ष |
| २) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रतिनिधी | | -- सदस्य. |
| ३) श्री. दयानंद मेश्राम, | सहसंचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई | -- सदस्य |
| ४) सबंधित विभागाचे सहसंचालक | | -- सदस्य |
| ५) संबधित संस्थेचे प्राचार्य | | --सदस्य |
| ६) श्री. द.श्री.कुकडे | प्रशासकीय अधिकारी, तंत्र शिक्षण, म.रा. मुंबई | --सदस्य सचिव |

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद व नागपूर अधिनस्त संस्थासाठी सदर समितीची बैठक **दि. १५ डिसेंबर, २०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय तंत्रनिकतन, नागपूर** येथे आयोजित करण्यात येत असून सदर बैठकीस सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद व नागपूर यांनी तसेच या तीन विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांच्या प्राचार्यांनी माहितीसह उपस्थित रहावे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 10684
दिनांक 6 DEC 2012

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

प्रति: सहसंचालक,तंत्रशिक्षण ~~विभागीय कार्यालय, अमरावती,~~औरंगाबाद व नागपूर

प्रत:-.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना असे कळविण्यात येते की, सदर बैठक आयोजित करण्याचे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी. आपल्या स्तरावर जबाबदार अधिका-यांची नियुक्ती करुन संबधितांशी संपर्क करुन उपस्थितीची निश्चिती करुन घेण्यात यावी.